दूरध्वनी : ८३८३६
८३८३७
८३४१०


# शिक्षण मंडळ कार्यालय
## पिंपरी-चिंचवड नगरपालिका
पिंपरी, पुणे १८.

क्रमांक : शिक्षण/का.वि./ 1 / 299/83

दिनांक : 4/6/83

प्रति,

कार्यवाह.
चिंचवड शिक्षण प्रसारक मंडळी.
दवारा न्यू इंग्लिश स्कूल भोई आळी.
चिंचवड, पुणे-33.

विषय:- चिंचवड शिक्षण प्रसारक मंडळ. चिंचवड
इंग्रजी व मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- मा. सहा. सचिव, शिक्षण मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र. व्ही. एल. एस/1082/65811/प्रा. शि 3 (सी. आर 249) दि. 13/5/1983.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस सुचित करण्यांत येते की, आपण चिंचवड येथे सुरू केलेल्या न्यू इंग्लिश स्कूल, या इंग्रजी व मराठी प्राथमिक शाळेस खास बाब म्हणून शासनाने विना अनुदान तत्वावर मान्यता देण्याचे ठरविलेले आहे. तथापी आपण खालील बाबींची पूर्तता त्वरीत करावी म्हणजे पुढील कारवाई करता ये[illegible]

1) संस्थेने सदर इंग्रजी व मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्याची व भविष्यकाळात कधीही शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही अशी लेखी स्वरूपामध्ये ठरावाद्वारे संमती दिली पाहिजे.

2) संस्थेने शाळेचा एकूण शिक्षकवर्ग विहीत वयोमर्यादित व प्रशिक्षित (एस. एस. सी. डी एड.) नेमलाच पाहिजे व त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

3) संस्थेने शाळेसाठी स्वतंत्र व आधुनिक शैक्षणिक साहित्याने परिपूर्ण अशी स्वत:ची इमारत उपलब्ध केली पाहिजे.

4) शाळेतील प्रत्येक वर्गामध्ये शासनाने ठरवून दिलेली विदयार्थी पटसंख्या असली पाहिजे,

(2)

दूरध्वनी : ८३८३६
८३८३७
८३४१०

# शिक्षण मंडळ कार्यालय
## पिंपरी-चिंचवड नगरपालिका
पिंपरी, पुणे १८.

क्रमांक : शिक्षण/का.वि./ / / दिनांक :

5) संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणताही दुष्परीणाम होणार न याची दक्षता घेतली पाहिजे.

6) शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन केलेच पाहिजे.

7) शाळेच्या ~~फीचे~~ फीचे दर शासनाने विहित केल्यानुसार असले पाहिजेत त्यापेक्षा जादा फी घेता कामा नये.

तरी वरील अटींची पूर्तता त्वरीत लेखी स्वरूपात इकडील कार्यालयाकडे करावी म्हणजे पुढील कार्यवाही केली जाईल.

प्रशासन अधिकारी.
शिक्षण मंडळ.

प्रति:-

1) ~~रिरिर~~= मा. शिक्षण उपसंचालक.
पुणे विभाग, पुणे-1.

2) मा. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.
यांना माहितीसाठी अग्रेषित.

दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता ...
... आदेशाचे संस्थेने पालन